वर्ष- १२ | अंक- ३५ | मुंबई, मंगळवार,१४ जुलै २०२६ ते २० जुलै २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2 आंबेडकरांचे गुरू ते सत्यशोधक समाजाची प्रेरणा; कबिरांचा महाराष्ट्रावर एवढा प्रभाव कसा पडला?

3 → गणवेशातील गुंडगिरी रोखायला हवी

गर्लफ्रेंडच्या भावाला बॉयफ्रेंडने 40 अश्लीलफोटो-व्हिडीओ पाठवले... ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

यशाच्या सुवर्णक्षणांना वंदन... प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांना कृतज्ञ अभिवादन!

मुंबई। ज्ञानरूपी सूर्याच्या तेजस्वी किरणांनी उजळलेल्या या मंगल क्षणी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या मे/जून २०२६ मध्ये आयोजित तृतीय वर्ष (संकेतांक G-15) पत्रकारिता पदवी परीक्षेचा निकाल दिनांक ०८ जुलै २०२६ रोजी जाहीर झाला. या आनंदोत्सवाच्या प्रसंगी यशाच्या शिखरावर आरूढ झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यार्चे मनःपूर्वक अभिनंदन, तर अपेक्षित यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना नव्या उमेदीसह पुन्हा उभे राहण्याच्या शुभेच्छा!

या परीक्षेचे अभ्यासकेंद्र आनंद विश्व गुरुकुल नाईट हायस्कूल अँड महाविद्यालय, रघुनाथ नगर, ठाणे येथे होते. या केंद्राचे संचालक मा. आकाश धवल सर हे केवळ प्रशासक नसून विद्यार्थ्यांच्या मनातील ज्ञानदीप प्रज्वलित करणारे दीपस्तंभ आहेत. त्यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनाने, शिस्तबद्ध नियोजनाने आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या आत्मीयतेने अनेक विद्यार्थ्यांच्या यशाचा मार्ग सुकर झाला. 'पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे' ही केवळ व्याख्या नसून समाजजीवनाला दिशा देणारे जीवनतत्त्व आहे, याची जाणीव त्यांनी आमच्या अंतःकरणात कायमची कोरली. अशा प्रेरणादायी गुरुवर्यांना शब्दांनी गौरविणे म्हणजे सागराला ओंजळीत मावण्याचा प्रयत्नच ठरेल.

या परीक्षेत श्री. विनोद मेढे, कांचन घाडीगावकर आणि सौ. मेघा पवार यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन यशाचा मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोवला आहे. त्यांच्या या यशामुळे केवळ त्यांचेच नव्हे, तर संपूर्ण पोलीस बातमीपत्र परिवाराचे मस्तक अभिमानाने उंचावले आहे.

परंतु या यशामागे एक अदृश्य, दिव्य आणि चिरंतन प्रेरणाशक्ती सदैव उभी आहे. ती म्हणजे स्वर्गीय डॉ. दीपक मोरेश्वर नाईक.

डॉ. नाईक हे केवळ संपादक नव्हते, केवळ पत्रकार नव्हते, केवळ समाजसेवकही नव्हते; ते विचारांचे विद्यापीठ होते, कर्तृत्वाचा महासागर होते, पत्रकारितेच्या मूल्यांचे चालते-बोलते दालन होते. त्यांनी असंख्य पत्रकार घडवले, समाजमन जागृत केले आणि सत्य, नीतिमत्ता व लोकहित यांचा अखंड ध्यास घेत आयुष्य व्यतीत केले. भाईंदर येथील त्यांच्या कार्यालयातून आजही दोन दैनिके आणि सहा साप्ताहिके नियमित प्रकाशित होत आहेत, हीच त्यांच्या दूरदृष्टीची आणि कर्तृत्वाची जिवंत साक्ष आहे.

आज ते आपल्या सोबत देहरूपाने नसले, तरी त्यांचे विचार, त्यांचे संस्कार, त्यांचे आशीर्वाद आणि त्यांनी दिलेली प्रेरणा प्रत्येकाच्या श्वासागणिक जिवंत आहे. त्यांच्या अकाली जाण्याने निर्माण झालेली पोकळी ही काळही भरून काढू शकणार नाही. आम्ही मिळविलेल्या प्रत्येक यशाच्या शिखरावर त्यांच्या कष्टांचे, मार्गदर्शनाचे आणि आशीर्वादांचे सुवर्णाक्षरांनी कोरलेले नाव सदैव झळकत राहील.

परीक्षेच्या संपूर्ण कालावधीत स्वर्गीय डॉ. दीपक मोरेश्वर नाईक यांचे चिरंजीव श्री. गुरुप्रसाद दीपक नाईक यांनी विद्यार्थ्यांची स्वतःच्या वाहनातून नियमित ने-आण करून, प्रत्येक परीक्षार्थी वेळेवर परीक्षा केंद्रावर पोहोचेल याची अत्यंत आत्मीयतेने काळजी घेतली. हे सहकार्य केवळ व्यवस्थापन नव्हते; ते वडिलांच्या समाजसेवेच्या परंपरेचा जिवंत वारसा होते. त्यांच्या या निःस्वार्थ सेवेला आमचा मनःपूर्वक सलाम.

आज या यशोत्सवाच्या क्षणी आम्ही सर्वजण कृतज्ञतेने नतमस्तक होत मा. आकाश धवल सर, स्वर्गीय डॉ. दीपक मोरेश्वर नाईक यांच्या अमूल्य प्रेरणेला आणि श्री. गुरुप्रसाद दीपक नाईक यांच्या समर्पित सहकार्याला शतशः प्रणाम करतो.

पोलीस बातमीपत्र परिवारातर्फे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शकांचे आणि सहकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन!

'महान व्यक्तींचे शरीर काळाच्या पडद्याआड जाते; परंतु त्यांचे विचार, संस्कार आणि कार्य अमरत्व प्राप्त करतात. स्वर्गीय डॉ. दीपक मोरेश्वर नाईक हे असेच एक तेजस्वी सूर्य होते, ज्यांच्या प्रेरणेचा प्रकाश आमच्या जीवनाला सदैव दिशा देत राहील. त्यांच्या स्मृती आमच्या प्रत्येक यशामध्ये, प्रत्येक शब्दामध्ये आणि प्रत्येक सामाजिक कार्यामध्ये अखंड जिवंत राहतील.'



नाशिकमध्ये एफडीएची मोठी कारवाई!

2 दिवसांत 9 हॉटेलांचं परवाने तत्काळ निलंबित... हॉटेलवाल्यांना पुन्हा इशारा



मुंबई। तुकाराम मुंढेंचं नाव घेताच आता महाराष्ट्रातील दुकानदार थरथर कापत आहेत. कारणही तसंच आहे, अन्न आणि औषध प्रशासन विभागातील आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून महाराष्ट्रात त्यांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. महाराष्ट्रातील भेसळखोरांचे धाबे तुकाराम मुंढेंमुळे दणाणले आहेत. गेल्या अनेक दिवसात मारलेल्या धाडीमध्ये लोकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या दुकानदारांवर कडक कारवाई केली आहे. नुसती कारवाई नाही तर अनेक दुकान असो हॉटेल्सचे लायसन्स रद्द करण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासन प्रशासन विभागाचे गेल्या दोन दिवसांमध्ये नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबारमधील हॉटेल्स आणि खाद्यगृहांची तपासणी केल्यानंतर तब्बल 9 हॉटेलांचं परवाने निलंबित केले आहेत. तर आवश्यक नोंदणी आणि परवाना नसल्याने चार हॉटेलला व्यवसायास प्रतिबंध लावण्यात आला आहे.



अन्न व आषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ग्राहकांच्या सुरक्षेसाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

एकदा वापरलेलं तेल पुन्हा वापरायचं नाही

तुकाराम मुंढेंचा इशारा; एफडीएचा ऐतिहासिक निर्णय

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ग्राहकांच्या सुरक्षेसाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. सुरक्षित अन्न, स्वच्छ ठिकाणं आणि जबाबदार अन्न व्यवसाय यासंदर्भात एफडीएने आदेश पारित केले आहेत. हॉटेल, रेस्तराँ, क्लाऊड किचन, ज्यूस बार यासह अन्न पुरवणाऱ्या सर्व ठिकाणांना नियमांचं पालन करावं लागणार आहे, अन्यथा त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला जाईल असं तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट सांगितलं आहे. यावेळी वापरलेलं तेल पुन्हा वापरायचं नाही असंही त्यांनी सांगितलं आहे.

'तेल हे पुन्हा वापरायचे नाही'

"वापरलेले तेल हे पुन्हा वापरायचे नाही. जेव्हा तेलातून आग येते, वास येतो तेव्हा ते 25 टक्के खराब झालेलं असतं. हे तेल पूर्णपणे बाहेर काढलं जावं, ज्याच्यावर प्रक्रिया केली जाऊ शकते. पण त्याचा अन्न शिजवण्यासाठी पुन्हा वापर करता कामा नये. हे फार धोकादायक आहे," असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं आहे. ऋअररअकच्या पद्ध्ध्ध

पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,१४ जुलै २०२६ ते २० जुलै २०२६

आंबेडकरांचे गुरू ते सत्यशोधक समाजाची प्रेरणा; कबिरांचा महाराष्ट्रावर एवढा प्रभाव कसा पडला?





भारतीय टपाल खात्यानं प्रसिद्ध केलेलं संत कबिरांवरील तिकीट कबीर. अडीच अक्षरांची थोरवी गाणारा महान संत. गेल्या शेकडो वर्षांपासून संपूर्ण भारतात कबिरांचा प्रभाव वाढत गेलेला आहे. कबिरांच्या विचारातून जगण्याची प्रेरणा घेणारे कोट्यवधी लोक जगभरात आपल्याला आढळतात. कबिरांचा जन्म साधारणपणे 1398 साली झाला असा अनेक अभ्यासकांचा अंदाज आहे. ते जन्माने मुस्लीम होते. काही लोक त्यांना जन्माने हिंदू मानतात. त्यांच्या जन्मासंबंधी विविध कहाण्या आहेत.

त्यातल्या काही कहाण्यांना चमत्काराची फोडणी दिलेली आहे. त्यांच्या जन्मासंबंधीच्या कोणत्याही कहाणीत रस नसला, तरी एक गोष्ट मात्र नीटपणे समजून घेतली पाहिजे. ती गोष्ट म्हणजे त्यांच्या जुलाहा जातीची.

कबिरांच्या जडणघडणीत नामदेवांची भूमिका महत्त्वाची

कबिरांचा जन्म ज्या जुलाहा जातीत झाला. त्या जातीची एक ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमी आहे.

ती पार्श्वभूमी कबिरांच्या जडणघडणीचा एक वेगळा पैलू समोर आणते. त्यांच्या जुलाहा जातीविषयी काही निष्कर्ष हजारीप्रसाद द्विवेदी यांनी मांडलेले आहेत.

जुलाहा जात ही वयनजिवी जात आहे. वस्त्राशी संबंधित व्यवसाय करून उपजिवीका करणाऱ्या जातींना वयनजिवी जाती म्हणतात.

हे लोक निर्गुण निराकार स्वरुपात ईश्वराची उपासना करत. ते जातिभेद आणि ब्राह्मण श्रेष्ठत्वाचे कडवे विरोधक होते.

एकूणच हिंदू समाजात त्यांना हिन, नीच आणि काहीवेळा अस्पृश्य मानलं जात होतं.

मुस्लीम धर्माच्या आगमनानंतर या जातीतील लोक मुस्लीम धर्मात धर्मांतरीत होऊ लागले.

या जातीतील लोकांची जातिभेद आणि ब्राह्मणवर्चस्वाला विरोध करण्याची जी भावना होती त्याचा संबंध बौद्ध आणि जैन धमार्शी आहे. बौद्ध आणि जैन धर्मातल्या या पूर्वाश्रमीच्या पुरोहित जाती असाव्यात.

कबिरांची जडणघडण समजून घेण्यासाठी त्यांच्या जुलाहा या वयनजिवी जातीची पार्श्वभूमी अत्यंत महत्त्वाची आहे. कबिरांवर नाथ संप्रदायाचा प्रभाव होता. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी यासंदर्भात मांडणी केलेली आहे.

नाथपंथी योग्याचे स्वरुप, नाथपंथाचे दार्शनिक सिद्धांत, त्यांची साधना पद्धती आणि त्यांच्या भाषा - अभिव्यक्तीचा प्रभावही आपल्याला कबिरांच्या वाणीवर जाणवतो. कबिरांवर जसा नाथ संप्रदायाचा प्रभाव होता तसाच वैष्णव विचारांचाही प्रभाव होता.

कबिरांवर रामानंदांमार्फत वैष्णव मताचा प्रभाव होता, अशी मांडणी पुरुषोत्तम अग्रवाल यांनी केलेली आहे. कबीरवाणी पाहिली असता, नाथ संप्रदायाचा प्रभाव अधिक असल्याचं जाणवतं. कबिरांवर आपल्या नामदेवांचाही प्रभाव होता.

कबिरांच्या जडणघडणीत नामदेवांची भूमिका फार महत्त्वाची आहे. नामदेवांचा उल्लेख कबिरांच्या अनेक रचनांमधून सापडतो.

कबिरांना सूफी संप्रदायाचाही परिचय होता. नाथ, रामानंदी वैष्णव, वारकरी, सूफी, शाक्त आणि त्याचबरोबर बौद्ध - सिद्ध या परंपरांचाही कबिरांवर प्रभाव होता. या सर्व परंपरांमधील काही गोष्टी कबिरांनी ग्राह्य मानल्या, तर काही गोष्टी अग्राह्य मानल्या. त्यांनी या सर्व परंपरांमधील वेषधाऱ्यांवर प्रखर टीका केली. कबिरांची वाणी फटकळ, आक्रमक, परखड, जहाल, सडेतोड आणि स्पष्ट होती. ते कोणत्याही विशिष्ट तत्त्वप्रणालीच्या आणि संप्रदायाच्या चौकटीत अडकले नाहीत. ते प्रखरपणे सत्य मांडत राहिले.

धर्माच्या क्षेत्रातल्या ढोंगबाजीची त्यांनी अत्यंत निर्भयपणे चिकित्सा केली. लोकांना निर्मळ भक्तीचा मार्ग दाखवला.

त्यांचा मूर्तीपूजा, यज्ञयाग आणि श्राद्धकर्म अशा कर्मकांडाला नकार होता. त्यातल्या पुरोहितशाहीवर त्यांनी आसूड ओढले.

तुकोबांच्या अभंगात कबिरांचा उल्लेख

कबिरांचा काळ साधारणपणे 1398 ते 1518 असा जवळपास 120 वर्षांचा आहे. या अथार्नेही त्यांना दीघार्युष्य लाभलं. कबिरांच्या हयातीतच त्यांची कीर्ती भारतभर पसरत होती.

साहजिकच त्यावेळी महाराष्ट्रातही कबिरांच्या वाणीचा प्रभाव गाजत होता. नामदेवांनंतर 48 वर्षांनी कबिरांचा जन्म झाला. त्यानंतर साधारणपणे पुढच्या 30 वर्षांत कबिरांची किर्ती आणि त्यांचा विचार महाराष्ट्रात पोचला असावा.

नेतृत्वविहिन झालेल्या वारकरी संप्रदायाला कबिरांच्या विचारांनी नवसंजीवनी मिळाली. त्यामुळेच पुढे एकनाथ महाराजांना बळ मिळालं.

एकनाथांनी जी कठोर धर्मचिकीत्सा केली त्यामागची पार्श्वभूमी कबिरांच्या विचारांची असावी.

सामाजिक समतेचा विचार



कृतीशीलपणे एकनाथांनी पुढे नेला. त्यांच्यानंतर तुकाराम महाराजांनी वारकरी संप्रदायाचं नेतृत्व केलं. त्यांच्यावर कबिरांचा लक्षणीय प्रभाव जाणवतो.

आज उपलब्ध असलेल्या तुकोबारायांच्या जवळपास 5-6 अभंगांमध्ये कबिरांचा उल्लेख आलेला आहे.

कबिराचे मागे विणू लागी शेले।
मूल उठविले कुंभाराचे॥



कबीर मोमीन लतिफ मुसलमान।
सेना न्हावी जाण विष्णूदास॥
चर्म रंगू लागे रोहिदासासंगे।
कबिराचे मागे शेले विणी॥
नागोजन मित्रा नरहरी सोनारा।
रोहिदास कबिरा सोईरिया॥
रामा बसवंत कबीर खेळिया।जोडा बरवा मिळाला रे। पाचा सवंगडीया एकचि घाई। तेथे नाद बरवा उमटला रे। ब्रह्मादिक सुरवर मिळोनिया त्यांनी। तो ही खेळ निवडला रे॥
मागे काय जाणो आइकिली वार्ता। कबीर साते जाता घड्या वाटी॥

कबिरांचा काळ साधारणपणे 1398 ते 1518 असा जवळपास 120 वर्षांचा आहे. या अथार्नेही त्यांना दीघार्युष्य लाभलं. कबिरांच्या हयातीतच त्यांची किर्ती भारतभर पसरत होती. तुकोबारायांच्या या अभंगातून आपल्याला त्यांच्यावरचा कबिरांचा प्रभाव लक्षात येतो. यातील एक लक्षवेधक बाब म्हणजे तुकोबारायांनी खेळियाच्या अभंगात केलेला कबिरांचा उल्लेख.

या अभंगात त्यांनी वारकरी संप्रदायातील प्रमुख 4 संतांचा निर्देश केलेला आहे. ते संत, त्यांचे दैवत, त्यांचे संघटन आणि त्यांच्या कायार्ची विशेषता तुकोबाराय सांगतात.

या प्रमुख 4 संतांच्या नावात त्यांनी कबिरांचा समावेश केला आहे.

नामदेवराय, ज्ञानोबाराय आणि एकनाथराय ही वारकरी संप्रदायातील मराठी संतांची 3 नावं आहेत. त्यात त्यांनी कबिरांचंही नाव नोंदवलं आहे.

याचा अर्थ तुकोबारायांच्या काळात कबीर हे वारकरी संप्रदायातील प्रमुख संत म्हणून स्वीकारले गेले होते असं दिसतं.

पुढच्या काळातही वारकरी संप्रदायात कबीर हे प्रमुख वारकरी संतांपैकी एक आहेत असं दिसतं.

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी तत्कालीन वारकरी संप्रदायाचे निरीक्षण करून काही नोंदी केल्या आहेत. त्यातील एका नोंदीत त्यांनी वारकरी संप्रदायात प्रमुख 5 संत मानले जातात, असं सांगितलं आहे.

त्यासाठी 'कलीयुगी संत जाहले अनंत। परि पटाईत पाचजण॥' अशा एका रचनेचा दाखला दिला आहे. त्या प्रमुख 5 संतांमध्ये नामदेवराय, ज्ञानोबाराय, कबीर, एकनाथराय आणि तुकोबाराय या संतांचा समावेश आहे.

'ज्ञानाचा एका, नामाचा तुका आणि कबिराचा शेखा'

वारकरी संप्रदायात रामकृष्णहरि हा मंत्र आहे. या मंत्रातील हरीभक्ती नामदेवांनी, कृष्णभक्ती ज्ञानदेवांनी आणि रामभक्ती कबिरांनी वाढवली, असं तुकोबाराय म्हणतात.

कबिरांमुळेच वारकरी संप्रदायाचा मंत्र पूर्ण झाला. त्यातूनच 'ज्ञानाचा एका, नामाचा तुका आणि कबिराचा शेखा' ही लोकोक्ती महाराष्ट्रात रुजली.

ज्ञानोबारायांचा वारसा एकनाथांनी, नामदेवरायांचा वारसा तुकोबारायांनी आणि कबिरांचा वारसा शेख महंमदबाबांनी पुढे चालवला.

या लोकोक्तील कबिरांचा शेखा म्हणजे शेख महंमद. शेख महंमदबाबा म्हणजे आपल्या मराठी माणसांचे कबीरच. त्यांना कबिरांचा अवतार मानलं जातं.

तुकोबारायांच्या काळापासूनच वारकरी संप्रदायात मोठ्या प्रमाणात कबिरांचा विचार स्वीकारला गेला होता. पुढच्या काळात हा प्रभाव कमी - अधिक प्रमाणात वारकरी संप्रदायात दिसून येतो.

पंढरपुरात चंद्रभागा नदीवर कबिरांच्या नावाचा 'श्रीराम कबीरमठ' आहे. हा मठ बराच जुना आहे. या मठात पूर्वी कबीरपंथी साधू येत असत.

मठातल्या नित्योपासनेत कबिरांचे दोहे, पदे आणि अभंग म्हटले जातात. पूर्वी इतर वारकरी संतांप्रमाणे आषाढी वारीसाठी कबिरांची पालखी काशीहून पंढरपूरला येत होती. त्याची नोंद 1882 साली न्या. महादेव गोविंद रानडे यांनी केलेली आहे.

त्यांनी आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या आणि दिंड्या यांचा अभ्यास करुन पंढरीची यात्रा या विषयावर प्रार्थना समाजात व्याख्यान दिलं होतं. त्या व्याख्यानात काशीहून पंढरपूरला येणाऱ्या कबिरांच्या पालखीचा उल्लेख आहे.

ही पालखी पंढरपुरातल्या कबीर मठात उतरत होती असं मठाचे प्रमुख ह.भ.प. विष्णू महाराज कबीर सांगतात.

पंढरपूरप्रमाणेच आळंदीतही कबीरमठ आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधी मंदिराच्या मागे पाण दरवाजाजवळ हा मठ आहे.

त्याचबरोबर या मठाच्या जुन्नर, ओतूर आणि आळे या ठिकाणी शाखा होत्या. त्यातील ओतूर आणि आळ्यातल्या कबीरपंथी मठांविषयी काही लिखीत उल्लेख सापडतात. आळंदीतला कबीरमठ वारकरी संप्रदायात प्रसिद्ध आहे.

या मठातील पंढरीनाथ कबीरबुवा हे सत्यशोधक राजकारणी होते. त्यांच्या बहिणीचा विवाह तुकोबारायांचे वंशज भागवत महाराज देहूकर यांच्याशी सत्यशोधक पद्धतीने झाला होता. हा विवाह वारकरी संप्रदायात गाजला होता.

कबीर आणि सत्यशोधक समाज

ओतूरलाही कबीरपंथीय वारकरी महंत होते. या कबीरपंथी वारकरी महंतांनीही सत्यशोधक विचारांचा प्रसार करण्यात महत्त्वाचं योगदान दिलं आहे.

त्यात रामदासबाबा आणि त्यांचे पुत्र विठ्ठलबाबा लोंढे हे दोघे कबीरपंथी वारकरी पितापुत्र होते. ते सत्यशोधक विचार सांगणारी कीर्तनं करत.

त्यांनीच या काळात 'सत्यशोधक कीर्तन' हा नवा प्रकार उदयाला आणला. त्यातून संतांचा आधार घेऊन सत्यशोधक विचार सांगणारी वारकरी पद्धतीची कीर्तनं होत असत. त्यावेळी असे अनेक सत्यशोधक कीर्तनकार महाराष्ट्रभर तयार झाले होते.

रामदासबाबांनी जी सत्यशोधक कीर्तनं केली ती कीर्तनं छापील स्वरुपात उपलब्ध असल्याचं 'सत्यशोधकांचे अंतरंग' या जी. ए. उगले यांच्या पुस्तकात नोंदवलं आहे.

रामदासबाबांचे गुरू कबीरपंथी साधू रघुनाथबुवा होते. ते मूळचे आळ्याचे. त्यांची मुंबईत डोंगरी भागात समाधी आहे.

मुंबईच्या या डोंगरी परिसरातच महात्मा फुल्यांचा वावर होता. मुंबईतला हाच भाग सुरुवातीच्या काळात सत्यशोधकांचं केंद्र बनला.

संत कबीर

इथेच महात्मा फुल्यांना महात्मा ही पदवी देण्यात आली. मुंबईतल्या अशाच एका कबीरपंथी साधूच्या भेटीचा वृत्तांत स्वतः महात्मा फुल्यांनी दिला आहे. तो महात्मा फुले समग्र वाङ्मयात छापलेला आढळतो. महात्मा फुल्यांना भेटलेले हे कबीरपंथी महंत वारकरीच होते. ते पंढरपूरच्या वाऱ्या करत असत असं महात्मा फुल्यांनी म्हटलं आहे.

त्यांनी पुण्यात फुल्यांची भेट घेतली तेव्हा फुले शेतकऱ्यांचा आसूड लिहीत होते. त्या कबीरपंथी वारकरी महंताला महात्मा फुल्यांचे विचार मनोमन पटले. अशारितीने मुंबई आणि पुणे परिसरातल्या अनेक कबीरपंथी वारकरी महंतांनी सत्यशोधक समाजाला आधार दिला.

मुळात सत्यशोधक समाजाची स्थापना झाली तीच कबिरांच्या प्रेरणेतून. महात्मा फुले आणि त्यांचे इतर अनुयायी एकत्र बसून चर्चा करत. जातीभेद निर्मूलनाचा विषय त्यांच्या चर्चेच्या केंद्रस्थानी असायचा. यावेळी ज्ञानगिरीबुवा हे कबीरपंथी महंत असायचे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत कबिरांचा वाटा

ज्ञानगिरीबुवा कबिरांच्या बिजक ग्रंथातला विप्रमतीसी नावाचा भाग सर्वांना वाचून दाखवत. मूळ ग्रंथ ब्रज भाषेत असल्यानं ते त्याचा मराठीत अर्थ सांगत.

बीजक हा ग्रंथ आजही कबीरपंथातला सर्वोच्च तात्विक ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात विप्रमतिसी हा भाग आहे.

विप्र म्हणजे ब्राह्मण, मती म्हणजे बुद्धी आणि तिसी म्हणजे तीस चौपाया. तीस चौपायातून कबीरांनी ब्राह्मणांच्या बुद्धीचं केलेलं वर्णन म्हणजे विप्रमतिसी.

याचा मराठी अर्थ ज्ञानगिरीबुवांनी सांगितला. त्यातूनच उच्चवणीर्यांच्या सामाजिक सांस्कृतिक गुलामीतून बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सत्यशोधक समाजाची स्थापना कबिरांच्या प्रेरणेतून झाल्याचा हा प्रसंग तुकाराम हणमंत पिंजण यांनी नोंदवला आहे.

मुळात सत्यशोधक हा शब्दच कबिरांचा आहे, असं समाजवादी विचारवंत एस. एम. जोशी यांनी म्हटलं आहे.

गाडगेबाबांप्रमाणेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही कबिरांचा प्रभाव होता.

तुकोबारायांच्या काळापर्यंत आणि काही अंशी नंतरच्या काळातही कबीर हे वारकरी संप्रदायातील प्रमुख संत होते. त्यापुढच्या काळात मात्र वारकरी संप्रदायात कबिरांच्या वाङ्मयावर तितका भर दिला जात नव्हता असं आपल्याला दिसतं. आधुनिक काळात वारकरी संप्रदायात कबिरांचा विचार नव्याने आणला तो गाडगेबाबांनी. गाडगेबाबांची जडणघडण जशी तुकोबारायांच्या अभंगांनी झाली होती तशीच ती कबिरांच्या दोह्यांनीही झाली होती.

गाडगेबाबांनी त्यांच्या 12 वर्षांच्या भ्रमंतीच्या काळात अनेक एकतारी भजनं ऐकली होती. ती एकतारी भजने प्रामुख्याने कबिरांची असावीत.

गाडगेबाबांच्या काळात महाराष्ट्रात कबिरांचा प्रभाव प्रामुख्याने दलित जनतेत जास्त होता. महाराष्ट्रातल्या दलित समाजात त्यावेळी महानुभाव आणि वारकरी संप्रदायाबरोबरच कबीर आणि रामानंदी पंथाचा प्रभाव होता.

त्या काळात गाडगेबाबांचा वावर दलित समाजातही होता. साहजिकच गाडगेबाबांनी या प्रकारे कबीरांचा विचार समजून घेतला. त्यांच्या कीर्तनात मुख्यत्वे तुकोबाराय आणि कबीर यांच्या वचनांवरच भर दिला जायचा. गाडगेबाबा आणि त्यांच्या परंपरेतील कैकाडीबाबांसारखे अनुयायीही कबिरांचे दोहे कीर्तनातून सांगत असत.

गाडगेबाबांप्रमाणेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही कबिरांचा प्रभाव होता. त्या काळात दलित जातीत प्रामुख्याने रामानंदी पंथ आणि कबीर पंथ असे 2 पंथ मोठ्या प्रमाणात होते.

विशेष म्हणजे या 2 पंथातील लोक एकमेकांच्या विरोधात असत.



कबीरपंथाच्या रिवाजाप्रमाणे ते दिवसातून 2 वेळा पंथाची बंदगी करत. त्याचबरोबर ते दररोज प्रार्थना करत.

या प्रार्थनेत कबिरांचे दोहे असत. त्याचबरोबर तुकारामांचे आणि चोखोबांचे अभंगही असत. इतर स्तोत्रे आणि श्लोकही असत.

या प्रार्थनेवेळी बाबासाहेबांसह त्यांची भावंडेही असत. बालपणीच्या वडिलांच्या या संस्कारांमुळे त्यांच्यावर संतांच्या अभंगांचा आणि कबिरांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात होता.

कबिरांचा हा प्रभाव त्यांच्यावर कायमच राहिला. त्यामुळे पुढे त्यांनी जे 3 गुरू मानले त्यात कबीरही होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदेही त्यांच्या प्रार्थना समाजाच्या प्रवचनांमधून कबीरपदांवर चर्चा करत असा उल्लेख त्यांच्या रोजनिशीत आहे.

कबीर आणि तुकाराम हे प्रार्थना समाजाचे अत्यंत आवडते कवी आहेत, असं विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्राच्या वैचारिक, सामाजिक - सांस्कृतिक जडणघडणीत कबिरांचा महत्त्वाचा वाटा आहे. वारकरी संप्रदाय, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गाडगेबाबा यांच्या चळवळी यावर कबिरांचा मुख्य प्रभाव आहे. महाराष्ट्र घडवणाया या चळवळी ज्या विचारातून घडल्या त्यातील एक महत्त्वाची प्रेरणा कबीरच होते.

संदर्भः

श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा कबीर कबीर - पुरुषोत्तम अग्रवाल

कबीर : संत, समाजसुधारक आणि कवी - इंद्रजीत भालेराव - सॅम पब्लिकेशन

भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड १ - चांगदेव भवानराव खैरमोडे

नाथ संप्रदायाचा इतिहास - डॉ. रा. चिं. ढेरे - पद्मगंधा प्रकाशन

लोकसाहित्य शोध आणि समीक्षा - डॉ. रा. चिं. ढेरे



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आजोबा मालोजीराव हे रामानंदी पंथी होते. बाबासाहेबांच्या वडिलांनी मात्र सातारला आल्यावर 1896 साली कबीरपंथाची दीक्षा घेतली.

त्यानंतर त्यांनी मांसाहार सोडला.

महात्मा फुले समग्र वाङ्मय (संपा. धनंजय किर, स. गं. मालशे आणि य. दी. फडके) लोकहितवादी दीनोद्धारक कर्मयोगी श्री गाडगेबाबा - प्रबोधनकार ठाकरे

न्या. रानडे यांची धर्मपर व्याख्यान

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार, १४ जुलै २०२६ ते २० जुलै २०२६

संपादकीय

गणवेशातील गुंडगिरी रोखायला हवी



संपादक दिपक मोरेश्वर नाईक





'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' अर्थात सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश, हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य. या चार शब्दांत संपूर्ण पोलीस व्यवस्थेचे ध्येय सामावलेले आहे. नागरिकांच्या जीवित, वित्त आणि स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपविण्यात आली आहे, त्यांच्याकडून समाजाला सुरक्षिततेची अपेक्षा असते. लोकशाहीत पोलीस हे केवळ कायद्याचे रक्षक नसून नागरिकांच्या विश्वासाचेही रक्षक असतात. परंतु जेव्हा हाच रक्षक भक्षक बनतो, तेव्हा लोकशाहीचा पाया हादरू लागतो. बारामती येथे उघडकीस आलेले प्रकरण हे अशाच हादरवून टाकणाऱ्या वास्तवाचे द्योतक आहे. पोलीस भरती आणि बँड पथकात दाखल करून घेण्याचे आमिष दाखवत एका महिलेचे लैंगिक शोषण करण्यात आल्याचा आरोप दोन पोलीस कर्मचाऱ्यांवर झाला आहे. राज्य राखीव पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक अमरनाथ कुंभार आणि मुंबई बँड पथकातील कॉन्स्टेबल मारुती करे यांच्याविरुद्ध न्यायालयाच्या आदेशानंतर भारतीय न्याय संहिता आणि अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला. या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे पीडितेला सुरुवातीला पोलिसांकडून न्याय मिळाला नाही. उलट न्यायालयाचे दार ठोठावल्यानंतरच गुन्हा नोंदविण्यात आला. याचा अर्थ, नागरिकांच्या संरक्षणासाठी उभी असलेली यंत्रणाच एखाद्या पीडितेला न्याय मिळवून देण्यात अपयशी ठरत आहे. एखाद्या आरोपीने गुन्हा करणे हा समाजातील विकृतीचा भाग असू शकतो; पण गणवेशातील अधिकाऱ्याने अधिकाराचा गैरवापर करून गुन्हा करणे ही लोकशाहीसाठी अधिक गंभीर बाब आहे. ही घटना काही पहिली नाही. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात पोलिसांवर विविध प्रकारचे गंभीर आरोप झाले आहेत. सन 2024मध्ये बदलापूर येथील शाळेतील लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर राज्यभर संतापाची लाट उसळली. नागरिक रस्त्यावर उतरले. त्यावेळी आंदोलनकर्त्यांवर झालेल्या पोलिसी कारवाईवरही गंभीर प्रश्न उपस्थित झाले. लोकशाहीत शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांशी संवाद साधण्याऐवजी बळाचा वापर करण्यात आला. त्याआधी अमरावती जिल्ह्यातील बडनेरा येथील कोठडीतील मृत्यू प्रकरणाने राज्याला हादरवले होते. पोलिसांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आणि न्यायालयीन चौकशीचे आदेश द्यावे लागले. राष्ट्रीय गुन्हे नोंदवही ब्युरोच्या आकडेवारीनुसार दरवर्षी देशभरात पोलीस कोठडीतील मृत्यू, पोलिसांविरुद्ध दाखल होणारे गुन्हे आणि अधिकाराच्या गैरवापराच्या तक्रारी समोर येतात. सर्वच तक्रारी सिद्ध होत नसल्या, तरी या आकडेवारीतून नागरिकांचा वाढता असंतोष आणि पोलीस यंत्रणेवरील प्रश्न स्पष्ट दिसून येतात. याचा अर्थ असा नाही की संपूर्ण पोलीस दल भ्रष्ट आहे. महाराष्ट्र पोलिसांमध्ये हजारो अधिकारी आणि कर्मचारी प्रामाणिकपणे, जीव धोक्यात घालून काम करत आहेत. त्यामुळे काही आरोपींच्या कृत्यांमुळे संपूर्ण दलाला दोष देणे अन्यायकारक ठरेल. पण याच कारणासाठी दोषींना पाठीशी घालणे अधिक घातक ठरते. गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांचे आधुनिकीकरण, सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण, नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि भरती प्रक्रिया पारदर्शक करण्यावर भर दिला आहे. या प्रयत्नांचे स्वागत केले पाहिजे. परंतु दुसरीकडे महिलांवरील अत्याचार, अनुसूचित जाती-जमातींवरील अत्याचार किंवा पोलिसांवरील गंभीर आरोपांच्या प्रकरणांत तातडीने आणि निष्पक्ष कारवाई होत नाही, हेदेखील तितकेच खरे. केवळ तांत्रिक आधुनिकीकरणाने पोलीस दल जनाभिमुख होत नाही. नैतिकता, उत्तरदायित्व आणि कायद्यापुढे सर्व समान असल्याची भावना रुजविणे अधिक महत्त्वाचे आहे. लोकशाही व्यवस्थेत पोलीस हे सरकारचे नव्हे, तर संविधानाचे सेवक असतात. त्यामुळे कोणतेही सरकार सत्तेत असले, तरी पोलीस दलाची निष्ठा केवळ कायद्याशी आणि नागरिकांच्या अधिकारांशी असली पाहिजे. दुर्दैवाने अनेकदा पोलिसांवर राजकीय दबावाखाली काम केल्याचे आरोप होतात. विरोधी पक्षांच्या आंदोलनांवर कठोर कारवाई आणि सत्ताधाऱ्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये संथ गती, अशी धारणा समाजात निर्माण होणेही तितकेच धोकादायक आहे. कायद्याच्या अंमलबजावणीत दुहेरी निकष दिसू लागले, तर लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास ढासळतो. बारामतीतील प्रकरणात पीडितेला थेट पोलीस ठाण्यात न्याय मिळाला नाही. न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतरच गुन्हा नोंदविला गेला, ही गोष्ट अधिक चिंताजनक आहे. जर एखाद्या सामान्य नागरिकाला स्वतःच्या हक्कासाठी न्यायालयात जावे लागत असेल, तर पोलीस यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. पोलिसांविरोधातील तक्रारींची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करणारी प्रभावी यंत्रणा आजही अनेक ठिकाणी सक्षमपणे कार्यरत नाही, ही वस्तुस्थिती आहे. ही परिस्थिती नवीन नाही. २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्रकाश सिंह विरुद्ध भारत सरकार या ऐतिहासिक खटल्यात देशातील पोलीस सुधारणांसाठी सात महत्त्वाच्या सूचना दिल्या. राज्य सुरक्षा आयोग, स्वतंत्र पोलीस तक्रार प्राधिकरण, तपास आणि कायदा-सुव्यवस्था विभाग वेगळे करणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांना निश्चित कार्यकाळ देणे, राजकीय हस्तक्षेप कमी करणे अशा सुधारणा सुचविण्यात आल्या. परंतु दोन दशकांनंतरही या शिफारशींची संपूर्ण आणि प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. यामुळेच पोलीस व्यवस्थेतील उत्तरदायित्व अपेक्षित पातळीवर पोहोचलेले नाही. पोलीस दलातील प्रामाणिक अधिकाऱ्यांचे संरक्षण आणि दोषींवर कठोर कारवाई ही दोन्ही उद्दिष्टे एकाच वेळी साध्य केली पाहिजेत. त्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात तक्रारींची ऑनलाइन नोंद, चौकशी प्रक्रियेचे संपूर्ण सीसीटीव्ही चित्रीकरण, महिलांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र प्रशिक्षित अधिकारी, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रकरणांमध्ये वेळबद्ध तपास, तसेच आरोपी पोलीस कर्मचाऱ्यांना राजकीय किंवा प्रशासकीय संरक्षण मिळणार नाही याची कायदेशीर हमी आवश्यक आहे. पोलीस भरती प्रक्रियेलाही अधिक विश्वासार्ह बनविण्याची गरज आहे. नोकरीचे आमिष, गुण वाढवून देण्याचे आश्वासन किंवा पैशांची मागणी यांसारख्या प्रकारांवर कठोर नियंत्रण ठेवले पाहिजे. अशा प्रत्येक प्रकरणात जलदगती न्यायालयातून खटला चालवून दोषींना शिक्षा झाली, तर भविष्यात अशा गुन्ह्यांना आळा बसेल.

किंमत मोजावीच लागेल



'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने 'सिंधू जल वाटप करार' रहित करण्याचा घेतलेला निर्णय आणि त्याप्रमाणे केलेली कृती पाकिस्तानच्या चांगलीच जिव्हारी लागली आहे. भारताने पाकिस्तानचे पाणी बंद करून त्याची दुखरी नस दाबली आहे. त्यामुळे अलीकडे या पाणी करारावरून पाकने भारताविरुद्ध गरळ ओकली नाही, असा एक दिवसही जातांना दिसत नाही. पाकिस्तानचे मंत्री मुसादिक मलिक भारताचे नाव न घेता म्हणाले, 'जे आमचे पाणी अडवतील, त्यांचे आम्ही हात तोडू.' या धमकीचा भारतावर काडीचाही परिणाम झाला नाही; किंबहुना भारताने या धमकीला भीकही घातली नाही. भारताविरुद्ध पाकने केलेल्या ४ युद्धांत, तसेच 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सपाटून मार खाल्ल्यानंतरही त्या देशाचा मंत्री असे बोलतो, हे हास्यास्पद आहे. भारताने गेल्या ७८ वर्षांत पाकिस्तानविरुद्ध कधीही इतकी कठोर भूमिका घेतली नव्हती. आतापर्यंतच्या सरकारांची मजल पाकिस्तानातील भारतीय राजदूतांना परत बोलावणे, भारतातील पाकिस्तानच्या राजदूताला परत पाठवणे, पाकिस्तानशी व्यापार थांबवणे आणि संयुक्त राष्ट्रांत तक्रार करणे इथपर्यंतच होती. याचा पाकिस्तानवर काहीही परिणाम झाला नाही. आता भारताने पाणी करार रहित करण्याची जी भूमिका घेतली आहे, तिचा परिणाम थेट पाकिस्तानी नागरिकांवर झाला आहे. त्यामुळे पाकिस्तानी राज्यकर्त्यांची खुर्ची धोक्यात, तर सैन्य कचाट्यात सापडले आहे. महागाईमुळे आधीच भिकेला लागलेल्या परिस्थितीत अशी स्थिती निर्माण होणे, ही कुठल्याही शासनकर्त्यांसाठी डोकेदुखीच असते. त्यामुळे आता जनतेला 'आम्ही काहीतरी करत आहोत', हे दाखवायचे असेल, तर 'हात तोडणे, पाय तोडणे', ही असली चिथावणीखोर विधाने करणे क्रमप्राप्त ठरते. मुसादिक मलिक यांनी केलेल्या विधानाला ही पार्श्वभूमी आहे. 'पाक वटवट करतो; पण भारत कृती करतो', असे सध्याचे चित्र आहे. भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा 'एफ.ए.टी.एफ.'च्या 'ग्रे लिस्ट'मध्ये (राखाडी सूचीमध्ये) टाकण्याची सिद्धता चालू केली आहे. 'एफ.ए.टी.एफ.' अर्थात् 'फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स', म्हणजेच 'आर्थिक कृती कार्य दल' ही संस्था जे देश आतंकवादाला अर्थसाहाय्य करतात, त्यांना 'ग्रे लिस्ट'मध्ये टाकते. या निकषानुसार पाकिस्तान या सूचीत कायमस्वरूपी प्रथम क्रमांकावर असायला हवा; कारण 'पाकचे राज्यकर्ते लोकांना मारतील; पण भारतविरोधी कारवाया करण्यासाठी आतंकवाद्यांना जगवतील', या मानसिकतेचे आहेत. 'ग्रे लिस्ट'मध्ये समाविष्ट असलेल्या देशांना 'एफ.ए.टी.एफ.'च्या कठोर देखरेखीचा सामना करावा लागतो, तसेच त्यांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या जागतिक वित्तीय संस्थांकडून निधी मिळवण्यातही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. ऑक्टोबरमध्ये 'एफ.ए.टी.एफ.'ची पूर्ण बैठक होणार आहे. याच बैठकीत भारत पाकिस्तानला 'ग्रे लिस्ट'मध्ये टाकण्यासाठी दबाव आणू शकतो. यासाठी भारत 'पाकिस्तानने अजूनही जिहादी आतंकवाद्यांना अर्थपुरवठा करणे थांबवलेले नाही', हे स्पष्ट करणारे अनेक व्हिडिओ आणि इतर पुरावे 'एफ.ए.टी.एफ.'ला सादर करू शकतो. यापूर्वी ऑक्टोबर २०२२ मध्ये पाकिस्तानचे नाव 'ग्रे लिस्ट'मधून हटवण्यात आले होते. ते कुठल्या निकषांवर हटवण्यात आले होते ?, हा सर्वांना पडलेला प्रश्न होता. यासाठी 'एफ.ए.टी.एफ.'वर टीकाही झाली. तथापि भारताच्या सुदैवाने आणि पाकिस्तानच्या दुर्दैवाने भारताचे वरिष्ठ 'आय.ए.एस्.' अधिकारी विवेक अग्रवाल यांची 'एफ.ए.टी.एफ.'च्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यामुळे पाकिस्तान 'ग्रे लिस्ट'मध्ये जाणार, हे निश्चित आहे. पाकिस्तानची त्याच्या स्वतःच्या कुकर्मांमुळे आज स्थिती अशी झाली आहे की, एकाच वेळी अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. एका बाजूला भारताने 'सिंधू जल करार' स्थगित करून त्याची अर्थव्यवस्था खिळखिळी केली आहे. दुसऱ्या बाजूला 'एफ.ए.टी.एफ.'च्या 'ग्रे लिस्ट'मध्ये पुन्हा समावेश होण्याची टांगती तलवार त्याच्यावर आहे. तिसऱ्या बाजूला अफगाणिस्तानातील तालिबान सरकारशी सीमावाद आणि वाढत्या चकमकी यांमुळे पश्चिम सीमेवर अस्थिरतेचा सामना करावा लागत आहे, तर चौथ्या बाजूला बलुचिस्तानसह खैबर पख्तूनख्वामध्ये वाढता फुटीरतावाद, सातत्याने होणारी आक्रमणे आणि सरकारविरोधी असंतोष, यांमुळे अंतर्गत सुरक्षेचे संकट अधिकच गडद झाले आहे. त्यात भरीस भर म्हणून देशातील वाढत्या महागाईच्या ज्वाळेत संपूर्ण देश होरपळत आहे. अशा प्रकारे बाह्य आणि अंतर्गत स्तरांवर पाकिस्तान अभूतपूर्व कोंडीत सापडला आहे. त्यामुळे भारताला धमक्या देऊन, तसेच स्वतःचे अपयश झाकून वेळ मारून नेण्यापलीकडे पाकसमोर सध्या तरी दुसरा पर्याय दिसत नाही. पाकिस्तानसमोर आज निर्माण झालेले संकट भारताने लादलेले नाही, तर त्याने स्वतः अनेक दशकांपासून आतंकवाद जोपासल्याचे आणि पोसल्याचे फलित आहे. जगात कुठलाही देश आतंकवादाला आश्रय देऊन स्वतः सुरक्षित राहू शकत नाही. आतंकवाद हा असा राक्षस आहे, जो कधी उलटेल सांगता येत नाही. पाकिस्तान अफगाणिस्तानाच्या आक्रमणांच्या माध्यमातून त्याचाही अनुभव घेतच आहे. पाकिस्तानची आज अशी स्थिती आहे की, त्याला कुठलाही देश, अगदी इस्लामी देशसुद्धा सहानुभूती दाखवायला सिद्ध नाही. भारताने यापुढेही पाकिस्तानविरुद्ध राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणारे कठोर धोरण कायम अंगीकारणे आवश्यक आहे. 'ज्याला जी भाषा समजते, त्याला त्याच भाषेत सांगावे लागते', हे लक्षात ठेवून आता भारताने आगामी काळात अधिक कठोर धोरणे आखणे आवश्यक आहे. खरेतर त्याही पुढे जाऊन पाकने जर आता भारताची एक जरी कुरापत काढली, तरी त्याला जगाच्या नकाशावरून पुसण्याची सिद्धताही भारताने ठेवली पाहिजे. शत्रूचा सर्वंकष नाश कसा करायचा?, हे इस्रायलकडून शिकले पाहिजे. नुकतेच इराणने अमेरिकेला धमकी दिल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी 'आम्ही इराणचे अस्तित्वच संपवून टाकू', अशी थेट धमकी दिली आहे. तात्पर्य हेच की, कुठल्याही देशासाठी आंतरराष्ट्रीय नियम नंतर, स्वतःच्या देशाचे हित जपणे प्रथम प्राधान्याचे असते. भारत आता त्याच दिशेने पावले टाकत आहे. आतंकवाद आणि त्याला आश्रय देणाऱ्या राष्ट्रांविषयीचा भारताचा हा पालटलेला दृष्टीकोन केवळ पाकिस्तानपुरता मर्यादित रहाणार नाही, तर जगातील अन्य राष्ट्रांसाठीही 'शांततेची अपेक्षा असेल, तर आतंकवादाचा त्याग अपरिहार्य आहे; अन्यथा त्याची किंमत चुकवावीच लागेल', हा कडक संदेश देणारा आहे !

कृत्रिम सौजन्यशीलता आणि आपण

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅटबॉट्स वापरकर्त्यांशी नेहमी विनम्र, संयमी आणि सकारात्मक पद्धतीने संवाद साधतात, त्यामुळे माहिती मिळवण्याचा अनुभव अधिक सुखद ठरतो. मानवी अभिप्रायावर आधारित प्रशिक्षणामुळे वापरकर्त्यांचे समाधान वाढवणारी उत्तरे देण्याकडे या तंत्रज्ञानाचा कल असतो. विनयशीलता कमी होत असल्याची तक्रार एकीकडे मोठ्या प्रमाणावर ऐकू येत असताना, अत्यंत अदबीने आणि आपल्या सर्व प्रश्नांवर शांतपणे, झटक्यात उत्तर देणारी एखादी व्यक्ती असेल? शक्यता नाकारता येत नाही; परंतु अशी व्यक्ती सर्वांनाच भेटेल, असे नाही. शिवाय, तेच ते प्रश्न पुन्हा पुन्हा विचारल्यावर वा सातत्याने वादाचा पवित्रा घेतल्यावर अशी व्यक्तीही रागाला येईल. मात्र, आपल्या प्रत्येक प्रश्न झेलण्यासाठी, कायमस्वरूपी आपल्या दिमतीला हजर राहण्याची सोय कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानातून साकारलेल्या चॅटबॉट्समुळे झाली आहे. हे तंत्रज्ञान आपल्या प्रश्नाचे उत्तर तर देतेच; परंतु आपले लाड करते, आपल्या चिकित्सक वृत्तीचे कौतुक करते! चॅटजीपीटी, जेमिनी, ग्रोक, क्लॉड या किंवा अशा कोणत्याही चॅटबॉटशी संवाद साधल्यावर आपला अनुभव काय असतो? आपल्या प्रत्येक प्रश्नाचे ते विनम्रपणे उत्तर देते, त्यानंतर आणखी काही माहिती हवी का, असे विचारते; या उत्तराने समाधान न झाल्यास प्रथम दिलगिरी व्यक्त करून झटक्यात नवीन उत्तर देते आणि आपले समाधान झाले का याची चौकशी करते. शिवाय असे प्रश्न विचारल्याबद्दल आपल्या चौकसपणाची वाखाणणीही करते. 'एआय'शी होणारा हा संवाद आपल्याला माहिती पुरवणारा तर असतोच; परंतु ते कधीच आपल्यावर रागावत नसल्याने, आपल्याशी उद्धट बोलत नसल्याने किंवा दुरुत्तरे करीत नसल्याने तो सुखावह ठरतो. थोडक्यात, आपण रागावून, चिडून काही विचारले, तरी एआय आपल्याशी सौजन्यानेच वागते. आपले मत त्याला मान्य नसले, तरी तसे थेटपणे न सांगता, 'तुमचे म्हणणे बरोबर आहे' किंवा ह्याहा एक चांगला दृष्टिकोन आहे,' असे नमूद करून ते संवाद पुढे नेते. त्याने केलेली चूक नजरेस आणून दिल्यावर, ते आभार मानतेच; परंतु अशी चूक पुन्हा होणार नाही, असेही सांगते. 'एआय'च्या या सौजन्याचे मूळ आहे, ते त्याच्या रचनेत. मानवी अभिप्राय जाणून घेऊन सुधारणा करण्याचे प्रशिक्षण 'एआय' मॉडेल्सना दिलेले असते. त्यामध्ये मानवी प्रशिक्षक 'एआय'च्या उत्तरांचे गुणांकन करीत असतात. 'एआय' वापरणाऱ्यांचे समाधान करणाऱ्या आणि त्यांना आनंदी ठेवणाऱ्या उत्तरांना ते अधिक गुण देत असतात. त्यामुळे चॅटबॉट्स नेहमी सौजन्यशील राहतात. माणसांचे 'मूड्स' बदलत असतात; कधी ते निराश होतात, तर कधी विलक्षण आनंदी; कधी त्यांना एखाद्याचा प्रचंड राग येतो, तर कधी त्याच्या प्रेमात असतात. 'एआय' हे तंत्रज्ञान असल्याने मानवांप्रमाणे त्याच्याकडे प्रेम, जिव्हाळा यांपैकी कोणतीही भावना नसते. मात्र, त्याच्याशी संवाद साधणाऱ्यांना आनंद मिळावा, ते खूश व्हावेत असा उद्देश नक्कीच असतो. तसे प्रशिक्षणही त्याला दिलेले असते. आजवरचे अन्य डिजिटल तंत्रज्ञान, इंटरनेटवरील शोधयंत्रे आणि 'एआय' यांत नेमका हाच फरक आहे. बाकी डिजिटल साधने आपल्याला हवी ती माहिती देत असली, तरी ती व्यक्तिगत संवाद साधत नाहीत. 'एआय' मात्र आपल्या भाव-भावनांशी समरस होते, आपला अहं सुखावत ठेवते; त्यामुळे ते अनेकांना आपल्या सर्वांत जवळच्या नात्यातील किंवा मैत्रीतील व्यक्तीपेक्षाही जवळची वाटू लागते. मात्र, वापरणाऱ्यांना नकार न देण्याच्या नादात आणि खूश ठेवण्याच्या प्रयत्नांत 'एआय' खोटी वा चुकीची उत्तरे देऊ शकतात; ते आपली दिशाभूल करू शकतात. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने अलीकडेच याबाबत संशोधन केले आहे. 'एआय'चा उपयोग जरूर करावा; मात्र त्याच्याबरोबर अधिकाधिक संवाद करणे, आपल्या वैयक्तिक जीवनातील सुख-दुःख सांगत राहणे आणि त्याने केलेल्या प्रशंसेने हुरळून जाणे धोकादायक ठरू शकते; कारण या तंत्रज्ञानामुळे आपला स्वतःबद्दल भ्रम तयार होतो, असा इशारा या संशोधनाने काढला आहे. तो गांभीर्याने घ्यायला हवा.

आरोग्याच्या मंदिरातला काळाबाजार

राज्यभर सोनोग्राफी केंद्रे, आयव्हीएफ क्लिनिक आणि गर्भपात केंद्रांवर विशेष पथकांमार्फत धडक तपासणी मोहीम राबविण्यात येणार, गैरप्रकार करणाऱ्या डॉक्टरांवर कठोर कारवाई होणार, स्त्रीबीज तस्करीसारख्या अमानुष गुन्ह्यांवर मकोकासारखा कठोर कायदा लागू करण्याचा विचार केला जाणार आणि आयव्हीएफ उपचारांसाठी स्वतंत्र नियमावली तयार केली जाणार, या सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलेल्या घोषणा निश्चितच स्वागतार्ह आहेत. मात्र, प्रश्न एवढाच की, हा निर्धार केवळ विधानसभेच्या नोंदीपुरता राहणार आहे की प्रत्यक्ष कृतीत उतरून आरोग्य व्यवस्थेतील काळा चेहरा उघडा पाडणार आहे? वैद्यकीय क्षेत्राला समाजात देवदूताचे स्थान आहे. डॉक्टरांच्या हातात जीवन देण्याची शक्ती असते. पण जेव्हा त्याच पवित्र व्यवसायात पैशाचा हव्यास, अनैतिक व्यवहार आणि गुन्हेगारी शिरकाव करते, तेव्हा तो समाजाच्या अस्तित्वालाच लागलेला किडा ठरतो. गर्भलिंग निदानावर बंदी घालणारा कायदा देशात तीन दशकांपासून अस्तित्वात आहे. तरीही मुलींच्या जन्माला अडथळे निर्माण करणारी विकृत मानसिकता संपलेली नाही. कायद्याच्या भीतीपेक्षा पैशाचे आकर्षण मोठे ठरले आणि काही डॉक्टरांनी समाजाच्या विश्वासालाच तडा दिला. त्यामुळेच आजही अनेक भागांत मुलींचे जन्मप्रमाण चिंताजनकरीत्या कमी आहे.आयव्हीएफ ही आधुनिक वैद्यकशास्त्राची मोठी देणगी आहे. अपत्यप्राप्तीची आशा हरवलेल्या हजारो जोडप्यांना या तंत्रज्ञानामुळे आधार मिळाला आहे. त्यामुळे आयव्हीएफ तंत्रज्ञानाला दोष देणे अन्यायकारक ठरेल. दोष आहे तो त्याच्या अनियंत्रित आणि व्यापारी वापराचा. आज अनेक ठिकाणी आयव्हीएफ हा उपचार कमी आणि उद्योग अधिक झाला आहे. भावनिकदृष्ट्या असुरक्षित असलेल्या दाम्पत्याच्या आशेचा बाजार मांडला जातो. लाखो रुपयांची पॅकेजेस, यशाचे अतिरंजित दावे, अनावश्यक उपचार आणि पारदर्शकतेचा अभाव या गोष्टी चिंताजनक आहेत. त्यातच स्त्रीबीज तस्करीसारखे प्रकार उघडकीस येणे म्हणजे आरोग्य व्यवस्थेवरचा विश्वास हादरण्याइतकी गंभीर बाब आहे. बदलापूर आणि अंबरनाथ येथील प्रकरणांनी महाराष्ट्राला अक्षरशः हादरवून सोडले. स्त्रीच्या शरीरातील बीज ही कोणतीही विक्रीची वस्तू नाही. ती मानवी जीवनाशी संबंधित अत्यंत संवेदनशील बाब आहे. पण पैशाच्या हव्यासापोटी काहींनी या प्रक्रियेलाही काळाबाजाराचे स्वरूप दिले. अशा घटनांमुळे वैद्यकीय व्यवसायाची प्रतिमा मलीन होते. त्यामुळे दोषींवर केवळ निलंबन किंवा सनद रद्द करणे पुरेसे ठरणार नाही. समाजाला ठोस संदेश देणारी शिक्षा आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर मकोका लागू करण्याचा विचार पुढे आला आहे. संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तयार झालेला हा कायदा वैद्यकीय क्षेत्रातील संघटित गैरव्यवहारांवर लागू करण्याची कल्पना प्रथमदर्शनी कठोर वाटू शकते. परंतु जर स्त्रीबीज तस्करी, गर्भलिंग निदानाचे रॅकेट, बनावट नोंदी, दलालांचे जाळे आणि आर्थिक व्यवहार यामागे संघटित टोळ्या कार्यरत असतील, तर अशा गुन्ह्यांकडे केवळ वैद्यकीय नियमभंग म्हणून पाहता येणार नाही. मात्र, मकोका हा उपाय असला तरी तो अंतिम उत्तर नाही. कठोर कायद्याइतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे निष्पक्ष तपास, जलद न्यायप्रक्रिया आणि दोषसिद्धीचे वाढते प्रमाण.सरकारने विशेष पथके स्थापन करून राज्यव्यापी तपासणी मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय वेळेवर घेतलेला असला तरी या मोहिमेचे यश केवळ धाडींच्या संख्येवर मोजता येणार नाही. तपासण्या नियमित, तंत्रज्ञानाधारित आणि राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त असल्या पाहिजेत. अनेकदा कारवाईची हवा काही दिवस राहते आणि नंतर सर्व काही पूर्ववत होते. हा अनुभव नवीन नाही. त्यामुळे यावेळी कारवाईची सातत्यपूर्ण साखळी निर्माण करावी लागेल. गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी हा स्वतंत्र चिंतेचा विषय आहे. अनेक ठिकाणी नोंदवही व्यवस्थित असते; पण प्रत्यक्षात गुप्त व्यवहार सुरू असतात. काही ठिकाणी कोडवर्ड, मध्यस्थ आणि मोबाईल नेटवर्कच्या माध्यमातून कायद्याला चकवा दिला जातो. त्यामुळे केवळ कागदपत्रांची तपासणी पुरेशी नाही. गुप्त माहिती, डिजिटल ट्रॅकिंग, आर्थिक व्यवहारांची चौकशी आणि नागरिकांचा सहभाग यांचा समन्वय आवश्यक आहे. या सर्व प्रश्नांच्या मुळाशी समाजाची मानसिकताही आहे. मुलगा हवा, वंशाचा दिवा हवा, वारस हवा या जुनाट आणि विषारी विचारांनी गर्भलिंग निदानाला खतपाणी घातले. डॉक्टरांनी पैसा कमावण्यासाठी हा मार्ग स्वीकारला; पण ग्राहक कोण होते? समाजाचाच एक भाग. त्यामुळे ही लढाई केवळ सरकार आणि डॉक्टर यांच्यातील नाही; ती समाजाच्या मूल्यांविरुद्ध उभी असलेली लढाई आहे. मुलगी म्हणजे ओझे हा विचार संपल्याशिवाय गर्भलिंग निदानाचे रॅकेट पूर्णपणे मोडीत निघणार नाही.त्याचप्रमाणे आरोग्यमंत्र्यांनी आरोग्य विभागातील पाच हजार पदभरतीची घोषणा केली आहे. एक हजार चारशे डॉक्टरांच्या नियुक्त्या, त्यानंतर आणखी 600 डॉक्टर आणि कम्युनिटी हेल्थ ऑफिसरची भरती ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. मनुष्यबळाची कमतरता ही आरोग्य व्यवस्थेतील मोठी समस्या आहे. मात्र, रिक्त पदे भरणे हा उपायाचा केवळ पहिला टप्पा आहे. नव्याने येणाऱ्या डॉक्टरांना नैतिक वैद्यकीय मूल्यांचे प्रशिक्षण, उत्तरदायित्वाची जाणीव आणि कठोर देखरेखीची व्यवस्था तितकीच महत्त्वाची आहे. केवळ संख्या वाढवून गुणवत्तेची हमी मिळत नाही. आरोग्य व्यवस्था ही विश्वासावर उभी असते. रुग्ण डॉक्टरकडे जातो तेव्हा तो आपले शरीर, आयुष्य आणि अनेकदा आर्थिक भविष्यही त्याच्याकडे सोपवतो. हा विश्वास तुटणे म्हणजे संपूर्ण व्यवस्थेचे अपयश होय. म्हणूनच सरकारने केवळ दोषींना शिक्षा करण्यावर भर न देता पारदर्शकता वाढविण्याचे उपायही राबवायला हवेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे वैद्यकीय परिषदांची भूमिका. नैतिकतेचे उल्लंघन करणाऱ्यांवर जलद निर्णय घेणारी आणि सार्वजनिक उत्तरदायित्व स्वीकारणारी यंत्रणा उभी राहिली पाहिजे.आरोग्य व्यवस्था ही नफेखोरीचा बाजार नसून माणुसकीचे मंदिर आहे, ही जाणीव पुन्हा प्रस्थापित करावी लागेल.

पोलीस बातमी पत्र


पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १४ जुलै २०२६ ते २० जुलै २०२६

गर्लफ्रेंडच्या भावाला बॉयफ्रेंडने 40 अश्लील फोटो-व्हिडीओ पाठवले... सकाळी दोघांची बॉडी सापडली



अशोकनगरमध्ये कारमध्ये तरुण-तरुणीचे रक्ताने माखलेले मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलिसांना सुसाइड नोट, धारदार शस्त्र आणि अनेक महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत.

मुंबई। मध्य प्रदेशातील अशोकनगर जिल्ह्यात घडलेल्या एका धक्कादायक घटनेनंतर या प्रकरणात नवे आणि हादरवून टाकणारे खुलासे समोर येत आहेत. ईसागढ रोडवरील फुटेरा चक परिसरात एका कारमध्ये तरुण आणि तरुणीचे रक्ताने माखलेले मृतदेह आढळून आले. मृत तरुणीची ओळख 24 वर्षीय मुस्कान जैन, तर तरुणाची ओळख 25 वर्षीय रितिक सोनी अशी झाली आहे. मुस्कानच्या कुटुंबीयांना दोघांचे अनेक आक्षेपार्ह फोटो पाठवले प्राथमिक तपासात रितिकने प्रथम मुस्कानची गळा चिरून आणि कुऱ्हाडीने वार करून हत्या केली. त्यानंतर त्याने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. ही घटना घडवण्यापूर्वी रितिकने मुस्कानच्या कुटुंबीयांना दोघांचे अनेक आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ व्हॉट्सॲपवर पाठवले होते. पोलिसांना कारमधून दोन पानांचे सुसाइड नोट तसेच विविध शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत. मुस्कानशी संपर्क होत नसल्याने पोलिसांत धाव माहितीनुसार, मुस्कान बुधवारी रात्री साडेआठच्या सुमारास घरातून कोणालाही न सांगता बाहेर पडली होती. त्यानंतर रात्री 9.43 वाजता तिच्या चुलत भावाने मोबाईलवरील इंटरनेट सुरू केले असता त्याला व्हॉट्सॲपवर 50 हून अधिक फोटो आणि तीन व्हिडिओ प्राप्त झाले. हे फोटो आणि व्हिडिओ रितिकने पाठवले होते. त्यामध्ये मुस्कान आणि रितिक एकत्र असल्याचे दिसत होते. हे पाहताच कुटुंबीयांमध्ये एकच खळबळ उडाली. मुस्कानशी संपर्क होत नसल्याने घाबरलेल्या नातेवाईकांनी मध्यरात्रीच्या सुमारास पोलीस ठाण्यात धाव घेत तिच्या बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली. त्यानंतर पोलिसांनी रितिकच्या मोबाईलचे लोकेशन शोधण्यास सुरुवात केली. शोधमोहीमेदरम्यान ईसागढ रोडवरील महाना गावाजवळ रस्त्यापासून सुमारे 20 फूट खाली एका खड्डयात आय-20 कार आढळून आली. कारचा पुढील भाग पूर्णपणे चुराडा झाला होता आणि हॉर्न सतत वाजत होता.

पोलिसांनी कार उघडली असता चालकाच्या सीटवर रितिकचा मृतदेह होता, तर शेजारच्या सीटवर मुस्कानचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह आढळला. पोलिसांनी कारची तपासणी केली असता अनेक धक्कादायक वस्तू सापडल्या. कारमधून अवैध पिस्तूल, कुऱ्हाड, पेपर कटर, सल्फासच्या गोळ्या, पेट्रोल, चॉकलेट्स आणि दोन पानांचे सुसाइड नोट जप्त करण्यात आले. कारच्या मागील सीटचा काही भाग जळालेला असल्याने कारला आग लावण्याचाही प्रयत्न करण्यात आल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तपासात रितिक हे अवैध पिस्तूल सिवनी मालवा येथून घेऊन आल्याचे समोर आले आहे. पोलिसांना मिळालेल्या सुसाइड नोटमध्ये रितिकने या नात्यात स्वतःला मानसिक त्रास सहन करावा लागल्याचा उल्लेख केला आहे. या प्रेमसंबंधामुळे तो प्रचंड तणावात होता आणि त्यातूनच त्याने ही भीषण घटना घडवल्याचे त्यात नमूद असल्याचे पोलिसांनी सांगितले. दोघेही इंदूरमध्ये एकत्र शिक्षण घेत होते आणि त्याच कंपनीत नोकरीही करत होते.

मात्र, काही काळापासून त्यांच्यात गंभीर मतभेद सुरू असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या पथकाने दोन्ही मृतदेहांचे शवविच्छेदन केले. डॉक्टरांच्या माहितीनुसार, मुस्कानच्या डोक्यावर जड वस्तूने वार करण्यात आला होता. तिच्या मानेजवळ दोन खोल जखमा आढळल्या असून नाकातूनही रक्तस्राव झाल्याचे दिसून आले. महिला डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत लैंगिक अत्याचार अथवा बलात्कार झाल्याची कोणतीही पुष्टी झालेली नाही.

मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करण्यासाठी विसेरा तपासणीसाठी जतन करण्यात आला आहे. तर रितिकच्या डोक्यात गोळी लागल्याच्या खुणा आढळल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी सहा सदस्यीय विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केली आहे. या पथकात दोन पोलीस ठाण्यांचे प्रभारी, एक सब-इन्स्पेक्टर आणि सायबर तज्ज्ञांचा समावेश आहे. एफएसएल पथकाने घटनास्थळावरून पुरावे गोळा केले असून सुसाइड नोट, कॉल डिटेल्स आणि फॉरेन्सिक अहवालाच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

फेसबुकवर मैत्री झाली, व्हॉट्सॲपवर जवळीक वाढली

'महिला सीईओ'ने आधी विश्वास जिंकला, मग सेवानिवृत्तासह तिघांना...



मुंबई। सेवानिवृत्तीनंतर निवांत आयुष्य जगत असताना सोशल मीडियावर आलेली एक फ्रेंडशिप रिक्वेस्ट आयुष्यभराची कमाई गमावण्याचे कारण ठरली. फेसबुकवर झालेली ओळख, व्हॉट्सॲपवर वाढलेली मैत्री आणि त्यानंतर 'नंबर ट्रेडिंग'मधून भरघोस नफा मिळवून देण्याचे आमिष... या सगळ्या जाळ्यात अडकलेल्या नाशिकमधील एका सेवानिवृत्त व्यक्तीसह तिघांची तब्बल ३७ लाख ९१ हजार ३६४ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'सायबर हनी ट्रॅप'चा बळी सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांची फसवणूक करण्यासाठी दिवसेंदिवस नवनवीन आयडिया वापरल्या जात आहेत. कधी गुंतवणुकीवर मोठा परतावा, तर कधी मैत्री आणि प्रेमाच्या नावाखाली नागरिकांना जाळ्यात ओढले जाते. अशाच एका 'सायबर हनी ट्रॅप'चा बळी नाशिकमधील सेवानिवृत्त व्यक्ती ठरली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिकरोड परिसरातील गोरेवाडी येथे राहणाऱ्या सेवानिवृत्त व्यक्तीला जुलै २०२५ मध्ये फेसबुकवर 'अंजली अग्रवाल' नावाच्या महिलेची फ्रेंडशिप रिक्वेस्ट आली. हाय-हॅलो नंतर जवळीक वाढली प्रोफाइलमध्ये ती पश्चिम बंगालमधील एका नामांकित कंपनीची मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याचे नमूद करण्यात आले होते. सुरुवातीला केवळ हाय-हॅलो, त्यानंतर कौटुंबिक गप्पा, दैनंदिन आयुष्याविषयी चर्चा आणि हळूहळू दोघांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण झाले. काही दिवसांनी हा संवाद फेसबुकवरून थेट व्हॉट्सॲपवर पोहोचला. मैत्री अधिक घट्ट झाल्यानंतर संबंधित महिलेने स्वतः 'नंबर ट्रेडिंग' या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात पैसे कमावत असल्याचा दावा केला. त्यासाठी तिने कथित नफ्याचे अनेक स्क्रीनशॉटही पाठवले. अल्पावधीत लाखो रुपयांचा नफा मिळाल्याचा आभास निर्माण करत तिने सेवानिवृत्त व्यक्तीला गुंतवणुकीसाठी प्रवृत्त केले. महिलेच्या सांगण्यावरून पीडित व्यक्तीने एका कथित ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर नोंदणी केली. त्यासाठी बँक खात्याची माहिती, पॅन कार्ड, आधार कार्ड यासह आवश्यक कागदपत्रांची नोंद करण्यात आली. सुरुवातीला सर्व काही व्यवस्थित सुरू असल्याचा भास निर्माण करण्यात आला. त्यानंतर वेगवेगळ्या यूपीआय आयडी आणि विविध बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास सांगण्यात आले. आर्थिक फसवणुकीचा आकडा ३७ लाख ९१ हजारांवर ऑगस्ट ते डिसेंबर २०२५ या चार महिन्यांच्या कालावधीत पीडित व्यक्तीकडून तब्बल साठहून अधिक आर्थिक व्यवहार करण्यात आले. दोन वेगवेगळ्या बँक खात्यांतून एकूण २७ लाख ५६ हजार १६४ रुपये संशयितांनी सांगितलेल्या खात्यांमध्ये जमा करण्यात आले. या फसवणुकीत अन्य दोघांनाही गंडा बसला असून, एकूण आर्थिक फसवणुकीचा आकडा ३७ लाख ९१ हजार ३६४ रुपये इतका झाला आहे.

नागरिकांनी काय काळजी घ्यावी?

सायबर पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावरील अनोळखी व्यक्तींशी आर्थिक व्यवहार टाळण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही व्यक्ती अल्पावधीत मोठा नफा मिळवून देण्याचा दावा करत असेल, तर त्यावर विश्वास ठेवू नये. कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करून वैयक्तिक माहिती, बँक खाते, पॅन किंवा आधारची माहिती देऊ नये. संशयास्पद व्यवहार आढळल्यास तातडीने १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा किंवा जवळच्या सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करावी.

दरम्यान, गुंतवलेली रक्कम परत मिळत नसल्याने आणि कथित ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवरील व्यवहार संशयास्पद वाटू लागल्यानंतर संबंधित व्यक्तीला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी नाशिक शहर सायबर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (इठर) २०२३ मधील कलम ३१८(४), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलम ६६(क) आणि ६६(ड) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. फसवणुकीसाठी वापरण्यात आलेले व्हॉट्सॲप क्रमांक, यूपीआय आयडी आणि ज्या बँक खात्यांमध्ये पैसे वर्ग करण्यात आले त्या खातेदारांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय पिसे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

दहशत माजवणाऱ्या 'गट्ट्या'वर एमपीडीएची कारवाई; साकीनाका पोलिसांकडून कुख्यात गुन्हेगार स्थानबद्ध



मुंबई : साकीनाका परिसरात गंभीर गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणारा कुख्यात गुन्हेगार किरण सुधाकर तोंडसे उर्फ ह्यगट्ट्याह्ण (वय ३१) याच्याविरुद्ध साकीनाका पोलिसांनी महाराष्ट्र धोकादायक कृत्ये प्रतिबंधक कायदा (एमपीडीए) अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. त्याच्याविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांत एकूण १४ गुन्ह्यांची नोंद असून, वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत सुधारणा होत नसल्याने अखेर ही कठोर कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तोंडसे हा अंधेरी-घाटकोपर लिंक रोड परिसरात घातक शस्त्रे बाळगून फिरणे, गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणे आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणे यासाठी कुख्यात होता. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले होते. तोंडसे याच्याविरुद्ध साकीनाका पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २०८/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल आहे. त्याच्या गुन्हेगारी अभिलेखाचा आढावा घेतल्यानंतर बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त यांच्या आदेशानुसार त्याला एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले. पोलिसांच्या नोंदीनुसार, तोंडसेविरुद्ध घाटकोपर आणि साकीनाका पोलीस ठाण्यांत खंडणी, मारहाण, शस्त्र बाळगणे आणि इतर गंभीर स्वरूपाचे मिळून १४ गुन्हे दाखल आहेत.

ही कारवाई बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, पोलीस सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था) डॉ. मनोजकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) डॉ. अभिनव देशमुख, पोलीस उपआयुक्त दत्ता नलावडे तसेच सहायक पोलीस आयुक्त दादासाहेब घुटूकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे यांच्या देखरेखीखाली सहायक पोलीस निरीक्षक नेत्रा मुळे, पोलीस हवालदार एकनाथ कदम आणि महिला पोलीस शिपाई अर्चना रेडेकर यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

वाढदिवस साजरा करायला मित्राच्या घरी गेली अन घडलं भयानक, 5 जणांना अटक

मुंबई। 'बिलेटेड बर्थडे' साजरा करण्याच्या बहाण्याने एका महिलेला जाळ्यात ओढून तिच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत पाच जणांना अटक केली आहे. महिलेला आधी घरी बोलावण्यात आले आणि त्यानंतर शीतपेयामधून अंमली पदार्थ देऊन तिच्यावर अतिप्रसंग करण्यात आल्याचा आरोप आहे. ही घटना 30 जून रोजी घडली असून, पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे. कर्नाटकची राजधानी बेंगलोर येथील ही घटना आहे.

'हॉटेलमध्ये पार्टी करु'

तक्रारीनुसार, पीडित महिलेची सोमशेखर नावाच्या व्यक्तीशी ओळख झाली होती. काही काळापासून ते एकमेकांच्या संपर्कात होते आणि त्यांची यापूर्वी भेटही झाली होती. घटनेच्या काही दिवसांपूर्वी महिलेचा वाढदिवस होता, परंतु सोमशेखर तिला भेटू शकला नव्हता. त्यामुळे त्याने 'बिलेटेड बर्थडे' साजरा करण्याच्या निमित्ताने तिला तालाघट्टापुरा येथे बोलावले. 30 जून रोजी सायंकाळी 5 च्या सुमारास महिला ठरलेल्या ठिकाणी पोहोचली, तेव्हा सोमशेखर आणि त्याचे काही मित्र तिथे आधीच उपस्थित होते. आधी घरी जाऊया आणि नंतर हॉटेलमध्ये पार्टी करू, असे सांगून सोमशेखरने तिला आपल्या घरी नेले.

गैरकृत्य करणारा नेमका कोण?

घरी पोहोचल्यानंतर सर्वजण एकत्र बसले आणि त्यांनी जेवण केले. त्यानंतर सोमशेखर आणि त्याच्या मित्रांनी महिलेला एक कोल्ड्रिंक पिण्यास दिले. महिलेने आरोप केला आहे की, हे कोल्ड्रिंक प्यायल्यानंतर तिला चक्कर येऊ लागली आणि ती अर्धवट शुद्धीत राहिली. ती स्वतःवर नियंत्रण ठेवू शकत नसतानाच, पाच जणांपैकी एकाने खोलीत येऊन तिच्या असहायतेचा गैरफायदा घेत तिच्यावर बलात्कार केला. यावेळी इतर मित्र हॉलमध्येच हजर होते. महिला पूर्णपणे शुद्धीत नसल्याने सुरुवातीला तिला तिच्यासोबत गैरकृत्य करणारा नेमका कोण होता, हे ओळखता आले नाही.

पाच जणांना न्यायालयीन कोठडी

या घटनेनंतर पीडितेने तात्काळ पोलिसांत धाव घेतली. तालाघट्टापुरा पोलीस ठाण्यातील एका महिला उपनिरीक्षकाने पीडितेचे समुपदेशन करून तिचा सविस्तर जबाब नोंदवून घेतला. पोलिसांनी या प्रकरणाचा वेगाने तपास केला असता, अमरेश नावाच्या आरोपीने महिलेवर अत्याचार केल्याचे समोर आले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी मुख्य आरोपी अमरेश, सोमशेखर आणि त्यांच्या इतर तीन मित्रांना अटक केली. न्यायालयाने सर्व पाचही आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली असून, पोलीस या घटनेशी संबंधित इतर पुरावे गोळा करत असून पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

50 वर्षीय वृद्ध महिलेचा तरण्याबांड पोरावर जडला जीव, प्रियकराच्या घरी जाऊन राहिली



बीड। एका 50 वर्षीय महिलेचा एका तरुणावर जीव जडला होता. तिने कुटुंबाचा देखील विचार केला नाही, तिने पोलिसांना सांगितलं की मला उरलेलं आयुष्य त्याच मुलासोबत घालवायचं आहे. ती महिला एप्रिल महिन्यात पळून गेली आणि जून 2026 मध्ये पुन्हा पोलीस ठाण्यात आली, तेव्हा तिने याबाबत माहिती दिली. एका वृद्ध महिला तरण्याबांड व्यक्तीच्या प्रेमात वेडी झाली होती. तिने समाजाचा कोणताही विचार केला नाही. तिने कुटुंबाचा देखील विचार केला नाही, तिचा तरुण मुलावर जीव जडला होता. महिलेनं पोलिसांच्या समोर सांगितलं की, ती आता आपले उरलेले आयुष्य आपल्या मित्रासोबत घालवणार आहे, असा तिने निर्णय घेतला. संबंधित महिला ही 50 वर्षीय आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील मथुरा येथील सुरीन ठाणे क्षेत्रातील एका गावाच घडली.

50 वर्षीय महिलेचा एका तरण्याबांड मुलावर जीव

ज्या वयात लोक नातवंडांना खेळवतात, तर काही महिला या आध्यात्मिक जीवन जगतात. मात्र अशातच एका 50 वर्षीय महिलेचा एका तरण्याबांड मुलावर जीव जडला होता. त्या महिलेला आयुष्यभर त्या तरुणासोबत राहायचे होते. त्या महिलेला तीन अपत्य आहेत. त्यापैकी दोन मुलांचा विवाह झाला आहे, तसेच एक मुलगी विवाह करण्यायोग्य आहे. 19 एप्रिल रोजी महिला घर सोडून निघून गेली. तपास करून देखील महिला कुठेच सापडली नाही. महिला बेपत्ता झाल्याची स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी महिलेचा शोध घेण्यास सुरूवात केली होती. अचानकपणे महिला 26 जून रोजी शुक्रवारी अचानकपणे पोलीस ठाण्यात दाखल झाली होती.

स्वतःच्या मजीर्ने प्रियकराच्या घरी...

तक्रारीत महिलेनं म्हटलं होतं की, ती स्वतःच्या मजीर्ने अलीगढ येथील रहिवासी असलेल्या तिच्या प्रियकराच्या घरी राहत होती. पोलिसांनी अनेकदा समजवण्याचा प्रयत्न केला तरीही, तिच्या प्रियकरासोबत राहण्यावर ती ठाम राहिली होती. खैरा चौरीचे प्रभारी भूपेंद्र सिंह सिरोही यांनी सांगितलं की, महिला ही तिच्या प्रियकरासोबत राहण्यावर आग्रही राहिली आहे. न्यायालायता दिलेल्या तिच्या जबाबाच्या आधारे पुढील कारवाई केली जात आहे.

धावत्या लोकलमध्ये प्रसूती; ठाणे रेल्वे पोलिसांच्या तत्परतेने आई-बाळाचे प्राण वाचले



ठाणे : धावत्या लोकलमध्ये एका महिलेची प्रसूती झाल्यानंतर ठाणे रेल्वे पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे माता आणि नवजात बाळाला वेळेत वैद्यकीय उपचार मिळाले. महिला पोलीस अंमलदार जमादार आणि गायकर यांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत आई व बाळाला सुरक्षितपणे कळवा येथील रुग्णालयात दाखल केले. सध्या दोघांचीही प्रकृती स्थिर असून ते सुखरूप असल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली.मिळालेल्या माहितीनुसार, लोकल प्रवासादरम्यान संबंधित महिलेला अचानक प्रसूतीवेदना सुरू झाल्या आणि धावत्या रेल्वेतच तिची प्रसूती झाली. घटनेची माहिती मिळताच ठाणे रेल्वे पोलिसांनी कोणताही विलंब न करता तातडीने घटनास्थळी धाव घेतली. महिला पोलीस अंमलदार जमादार व गायकर यांनी आई आणि नवजात बाळाची काळजी घेत त्यांना सुरक्षितपणे रेल्वेबाहेर काढले.

यानंतर दोघांनाही तातडीने कळवा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. वेळेवर मिळालेल्या पोलिसांच्या मदतीमुळे संभाव्य धोका टळला. सध्या आई आणि बाळ दोघांचीही प्रकृती चांगली असून या प्रसंगात ठाणे रेल्वे पोलिसांनी दाखविलेल्या संवेदनशीलता आणि तत्परतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com